ISSN 2321-9572

# सामाजिक अनुसंधान

त्रैमासिक- वर्ष १ले • अंक ३रा • मार्च - जून -२०१४ • मूल्य १००रु.

*International Level Referred*



• संपादक •

कैलास गणपतराव कानिंदे

Scanned by CamScanner

MAHMAR 42198/2013
ISSN 2321-9572

*International Registered & Recognized*
*Research Journal Related to Higher Education for all subjects*

# सामाजिक अनुसंधान

त्रैमासिक • वर्ष 1 ले • अंक 3 रा • मार्च - जून 2014

• संपादक : प्रा. कैलास कानिंदे •

• कार्यकारी संपादक •
डॉ.सिध्दार्थ जाधव (बीड)
मनोज गिमेकर (भोकर)

• सहसंपादक •

डॉ.सुभाष पवार (अमरावती)
प्रा. राहुल पंडित (जुन्नर)
प्रा.भारत कल्याणकर (अमरावती)
प्रा.लक्ष्मण डोंगरे (हिमायतनगर)
प्रा.संदिप गोरे (वसमत)
प्रा.साईनाथ बनसोडे (औरंगाबाद)
प्रा.व्यंकट कोरेबोईनवाड (जालना)
प्रा. सुभाष रगडे (नांदेड)

सामाजिक अनुसंधान त्रैमासिक अंकातील लेखकांची/संशोधकाची मते ही त्यांची वैयक्तिक असून त्याबद्दल मुद्रक, मालक, प्रकाशक, संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

टिप - कॉपीराईट विषयी आलेल्या तक्रारी बाबत संबंधित लेखांचे संशोधक, लेखक जबाबदार असतील. मुद्रक,मालक, प्रकाशक, संपादक मंडळ जबाबदार राहणार नाहीत.

"सामाजिक अनुसंधान" हे त्रैमासिक मुद्रक मनोहर दिगांबर जोंधळे यांनी मालक, प्रकाशक, संपादक कैलास गणपतराव कानिंदे यांच्याकरीता रोहिणी प्रिंटींग प्रेस, वैशालीनगर, प्लॉट नं.19, तरोडा (बु.) नांदेड 431605 येथे छापून कार्यालय "मुक्ताई निवास", वनक्षेत्र कार्यालयाजवळ, समतानगर,भोकर ता.भोकर जि. नांदेड - 431801. येथे प्रकाशित केले.

Scanned by CamScanner

## अनुक्रमणिका



| अ. क्र. | शोध निबंधाचे शीर्षक | संशोधकाचे नाव | पृ.क्रं. |
|---|---|---|---|
| ०१ | मुलतानी समुदायाची ओळख | डॉ. कृष्णा शेंडे | ०१ |
| ०२ | छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक कार्य : एक समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा. डॉ. कांबळे बी. एम. | १० |
| ०३ | "स्त्रियांवर होणारे अत्याचार व मानवाधिकार" | डॉ. सुभाष के. पवार | १३ |
| ०४ | लोकशाही आणि भ्रष्टाचार | प्रा. कदम एम. आर.<br>डॉ. विजापुरे बालाजी विठ्ठलराव | १६ |
| ०५ | मानवी हक्क आणि संकल्पना | कानिंदे के.जी.प्रा.सक्करगे एन.व्ही. | २० |
| ०६ | भारतीय राज्य घटनेचा सरनामा | प्रा. नामदेव बाबुराव डोंगरे | २४ |
| ०७ | मराठी भाषा :-संवर्धन व उपाय | प्रल्हाद परसराम जाधव | २६ |
| ०८ | महाराष्ट्रातील आदिवासी विकास कार्यक्रमाचे मूल्यमापन | प्रा. एस.एस. जाधव | २८ |
| ०९ | आदिवासी जमातीच्या कल्याणकारी योजनांचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा पंडित संभाजी वाघमारे | ३१ |
| १० | मानवी हक्क आणि महिला | दंडवे बसवेश्वर नारायणराव | ३४ |
| ११ | नांदेड जिल्ह्यातील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या स्वयंरोजगार पतपुरवठ्याचा अभ्यास | प्रा. डॉ.पी.ई.विभुते<br>मुजळगेकर एच. वाय. | ३७ |
| १२ | बालकामगार - एक सामाजिक समस्या | साबळे रमेश गणपत | ४१ |
| १३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि भारताची सद्यस्थिती | प्रा. देविदास गंगाराम नवसे | ४२ |
| १४ | सामाजिक संशोधन व आदिवासी विकास | प्रा.एकनाथ दत्तात्रय वाजगे | ४५ |
| १५ | मराठवाडयाची निर्मिती एक दृष्टीक्षेप | प्रा. प्रभाकर ग.जाधव | ४८ |



Scanned by CamScanner

# सामाजिक संशोधन व आदिवासी विकास

प्रा.एकनाथ दत्तात्रय वाजगे
श्री शिव छत्रपती महाविद्यालय,जुन्नर,(पुणे)

विज्ञानाच्या प्रगतीची जाणीव पदोपदी व्हावी इतके ते सामान्य जीवनाशी जाऊन भिडले आहे. विज्ञानाने आपल्या कक्षा विस्तृत केल्या असून त्या जोरावर आज तंत्रज्ञानाचा, उद्योग व्यवसायांचा, शस्त्रास्त्रांचा, वाहतुकीच्या साधणांपासून ते घरात वापरावयाच्या विविध वस्तूंचा शोध वा त्यामध्ये अमुलाग्र बदल घडवून आणले आहेत. वैद्यकशास्त्र दिवसेंदिवस प्रगत होत आहे. या सर्व बदलांबरोबरच समाजव्यवस्थेतही मोठे बदल घडुन येताना दिसत आहे. भौतिक विकासाचा परिणाम सामाजिक विकासावर होतच असतो. दिवसेंदिवस घडत चाललेल्या या सुधारणावादी बदलाच्या मुळाशी विविध क्षेत्रातील संशोधक व त्यांनी केलेले संशोधन या बाबी महत्वाच्या ठरत आहे. सामाजिक विकासाच्या दृष्टीने विचार करता भौगोलिक परिस्थितीनुसार त्या त्या ठिकाणच्या विकासामध्ये भिन्नता दिसून येते. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भाग व ग्रामीण भागाच्या तुलनेत आदिवासी दुर्गम भाग यातील विकास कमी झालेला दिसून येतो.

कोणत्याही मागासलेल्या समाजाची सुधारणा व्हावयाची असेल तर त्यासाठी त्या समाजात शिक्षणाचा प्रसार झाला पाहीजे हा अगदि साधा सिद्धांत आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात ज्या प्रमाणामध्ये आदिवासी क्षेत्राचा विकास होणे अपेक्षित होते त्या प्रमाणात तो झालेला दिसून येत नाही. एकात्मिक क्षेत्रविकास, धान्यकोष योजना, व्यवसाय प्रशिक्षण केंद्र योजना, खावटी कर्ज योजना, स्वयंरोजगार कर्ज पुरवठा योजना या सारख्या वेळोवेळी सरकारकडून राबविण्यात आलेल्या योजनांची विकासाच्या दृष्टीने फलनिष्पत्ती दिसून येत नाही. त्यामुळे आर्थिक व पर्यायाने सामाजिक विकास मंदावल्याचे चित्र दिसून येते. आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीवर संशोधन होण्याची आवश्यकता आहे. सामाजिक संशोधनाच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर उत्तरे शोधता येईल.

**सामाजिक संशोधन –**

वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करून नैसर्गिक शास्त्रात संशोधन केले जाते. त्याचप्रमाणे वैज्ञानिक पद्धतीद्वारे सामाजिक घटनांच्या संदर्भात संशोधन करण्यात येते. जे संशोधन सामाजिक घटनांबाबत केले जाते अशा संशोधनास सामाजिक संशोधन असे म्हणतात.

कोणत्याही सामाजिक समस्या सोडविण्याकरता किंवा कोणत्याही गृहित कृत्यांचे परिक्षण करणे, नवीन घटनांचा शोध घेणे, विशिष्ट घटनांतील नवीन समस्या शोधण्याच्या उद्देशाने कोणत्या तरी योग्य पद्धतीचा उपयोग करणे हा सामाजिक संशोधनाचा अर्थ आहे. सामाजिक संशोधन हे शास्त्रीय नियमानुसार अशा मानवी क्रियांकडे संकेत करते की ज्याद्वारा जीवनाच्या संबंधात आपल्या ज्ञानाची वृद्धी होणे शक्य होते. तसेच अनेक घटना आणि त्यांच्या कारणांमध्ये आढळून येणा—या पारंपारिक संबंधाच्या संदर्भात नवीन माहिती प्राप्त होते. सामाजिक संशोधन ही ज्ञानप्राप्तीची अशी एक पद्धत आहे की जी निरीक्षण, वर्गीकरण, प्रयोग आणि निष्कर्षांच्या सामान्य पद्धतीवर आधारीत असते. आणि या पद्धतीद्वारा अज्ञात सामाजिक घटनांचा शोध घेतला जातो.

**आदिवासी विकास : सदयस्थिती :–**

मानवी उत्क्रांती कशी झाली याची पाळेमुळे आदिवासी समाजात शोधावी लागतात हे उत्क्रांतीचा सिद्धांत मांडताना डार्विनने सांगितले होते जागतिक स्तराचा



Scanned by CamScanner

विचार करताना एकूण लोकसंख्येच्या २३ टक्के आदिवासी समाज आहे. भारतात ८ टक्के आदिवासी संख्या आहे. महाराष्ट्राच्या लोकसंख्येपैकी ९.६ टक्के लोकसंख्या आदिवासींची आहे. भारतात ३०० च्या सुमारास असणा—या आदिवासी जमातींपैकी ४७ प्रमुख जमाती महाराष्ट्रामध्ये आहे. भारतातील आदिवसींपैकी ९०.३ टक्के आदिवासी हे त्यांच्या पारंपारिक प्राथमिक व्यवसायावर अवलंबून असून ७.९ टक्के जमीन आदिवासींकडे आहे. ९० टक्के कोळसा खाणी आणि ४० टक्के इतर खाणी आदिवासी क्षेत्रात आहेत. खनिज संपत्तीची ही उपलब्धता त्यांच्या आर्थिक, सामाजिक स्थितीत कोणतीही सुधारणा घडवून आणू शकलेली नाही. अंतर्गत स्वयंपुर्तता, सामाजिक रचना, चालीरिती परंपरा, या बाबतीतले वेगळेपण हे या संस्कृतीचे प्रमुख वैशिष्टये होय. आफ्रिका, आशिया, ऑस्ट्रेलिया, अमेरिका या ठिकाणच्या आदिवासींचा अभ्यास केल्यानंतर आदिवासी संस्कृतीत साम्यवादी अर्थव्यवस्था होती हे लुईस मॉर्गन या विचारवंताने मान्य केले आहे. एकंदरीत या समाजाच्या विकासासाठी व्यापक नियोजन, शिक्षणाचा प्रसार, साधनसंत्तीचे नियोजन यासारख्या बाबी महत्वाच्या आहेत त्यासाठी संशोधनास उत्तेजन मिळून सामाजिक विकासात त्याचा हातभार लागणे महत्वाचे आहे.

<u>आदिवासी क्षेत्रातील संशोधनात येणा—या समस्या :—</u>

१) आदिवासी संशोधनातील महत्वाची समस्या म्हणजे प्रादेशिक दुर्गमता होय. दुर्गम भागातुन तथ्य संकलनामध्ये अडचणी येतात.

२) आदिवासींची बोलीभाषा ही संशोधकास माहिती संकलंनामध्ये अडसर ठरते. वेगवेगळया भागातील वेगवेगळया बोली भाषांचे आव्हान संशोधकासमोर असते. दुभाषाची मदत घेवून केलेल्या संप्रेषणामध्ये अनेक त्रूटी राहतात. त्याचा परिणाम संशोधनावर होतो.

३) आदिवासींच्या परंपराविषयी, इतिहासाविषयी पार्श्वभूमीची लिखित माहिती मिळत नाही. एका पिढीकडून दुस—या पिढीकडे तोंडी स्वरूपात येणा—या माहितीला कोणताही लिखीत आधार नसतो. त्यामुळे संशोधनाच्या वस्तुनिष्ठतेवर प्रश्न निर्माण होतो.

४) वेगवेगळया भागामध्ये आदिवासींच्या संख्येची योग्य माहिती मिळत नाही. नावनोंदणी पासून दूर राहिल्याने वास्तविक लोकसंख्या संशोधकाला मिळत नाही. त्याचा परिणाम जनसंख्या व न्यादर्श यांच्या प्रमाणावर होतो.

५) आदिवासी योजनांचा, शासकीय नोक—यांचा लाभ मिळविण्याच्या दृष्टीने बोगस आदिवासींची संख्याही मोठया प्रमाणात दिसुन येते. केवळ आडनावाच्या साधर्म्यामुळे अशा पद्धतीची बोगस नावनोंदणी झाल्यामुळे संशोधकास सामाजिक व्यवस्थे विषयीची चुकीची माहिती मिळण्याची शक्यता असते.

६) विशिष्ट आदिवासी जमातीच्या चालीरिती रूढी, परंपरा, बोली या वेगवेगळया भागामध्ये भिन्नभिन्न स्वरूपात आढळतात. त्यामुळे एका जमातीवर केलेल्या संशोधनाचे निष्कर्ष त्याच जमातीच्या इतर ठिकाणच्या समुहास लागू पडतीलच याची खात्री देता येत नाही.

७) आदिवासी भागातील संशोधनासाठी सरकारी पातळीवर आर्थिक तरतुद त्रोटक स्वरूपाची आहे त्या तुलनेत दुर्गम भागात संशोधनासाठी लागणा—या खर्चाचे प्रमाण अधिक आहे त्यामुळे या क्षेत्राकडे संशोधक पाठ करत असल्याचे दिसून येते.

९)आदिवासी जीवनाविषयी माहिती देणा—या प्राथमिक संदर्भ साधानांची, पुस्तकांची उपलब्धता कमी प्रमाणात आहे.

१०)निरक्षरतेमुळे व पारंपारिक समजुतीमुळे संशोधकास आवश्यक असणारी माहिती आदिवासींकडून मिळत नाही.

<u>उपाययोजना :—</u>



Scanned by CamScanner

१) आदिवासी विकासासाठी त्यांच्या जीवनाच्या वेगवेगळया क्षेत्रात संशोधन होण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी आवश्यक असणारा निधी सरकारपातळीवर उपलब्ध होणे गरजेचे आहे.

२) स्वयंसेवी संस्थानी आदिवासी संशोधनामध्ये पुढाकार घेतल्यास आदिवासींचा जीवनमान उंचावण्यास मदत होईल.

३) महाविदयालयीन स्तरावर सभोवतालच्या आदिवासी समाजातील परंपरांचे, रूढींचे, लोकसंख्येचे, स्थानिक व्यवसायांचे, साधन संपत्तीचे सर्वेक्षण करता येणे शक्य आहे.

४) आदिवासी क्षेत्रात काम करणा–या प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या शिक्षकांस कृतीसंशोधनाबरोबरच सभोवतालच्या आदिवासी परिसरातील समस्यांवर संशोधन करण्यास प्रोत्साहन देता येईल.

५) आदिवासी जमातीवर झालेल्या संशोधनास सरकार पातळीवर प्रसिध्दी देण्याची व्यवस्था राबविता येईल.

६) आदिवासी बांधवांच्या पारंपारीक व्यवसायामध्ये सुधारणांसाठी त्या त्या व्यवसायांचा अभ्यास करून त्यामध्ये आधुनिकता आणण्याचा प्रयत्न करता येईल.

७)आदिवासी आश्रमशाळांमध्ये पारंपारिक शिक्षणक्रमाबरोबर अभ्यासक्रमात लवचिकता ठेवून स्थानिक साधनसंपत्तीच्या दृष्टीने परंपरागत चालणा–या उदयोगव्यवसायांची शास्त्रीय माहिती दिल्याने संशोधन वृत्तीस चालना मिळेल.

८) इयत्ता १ ते ४ च्या स्तरावर स्थानिक प्रदेशाची माहिती देताना परिसरातील वैशिष्ट्यांसाठी भूप्रदेशाविषयी संशोधन व्हावे.

**संदर्भसूची :–**

१) देवगावकर एस.जी.(२०११) आदिवासी विकास प्रकाशन, नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन.

२) देशमुख भौमिक (२०११) आदिवासी विकास, पुणे, पुणे विदयापीठ मुद्रणालय.

३) गारे गोविंद (२०००) आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ, पुणे, सुगावा प्रकाशन.

४) गारे गोविंद (१९७४) सहयाद्रीतील आदिवासी महादेव कोळी मुंबई, सहाध्ययन प्रकाशन.

५) मांडे प्रभाकर (२००३) भारतीय आदिवासी विकासाच्या समस्या, औरंगाबाद, गोदावरी प्रकाशन.

६) पगारे माधव दगडू (डिसें.२०११) शिक्षण समीक्षा

७) संपादक (१९७६) विश्वकोष, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ



Scanned by CamScanner